**फौ.कि.अ.क्र.१२४/२०२६**
**अभिषेक शिवाजी साबळे वि. सरकार**

MHSO160007972026

<u>**नि.क्र.१ वरील आदेश**</u>
**(पारित दिनांक ०७/०७/२०२६ )**

**१.** अर्जदाराने प्रस्तुत अर्ज अपराध क्र.९६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५), पर्यावर (संरक्षण) अधिनियम कलम ९, १५ प्रमाणे करमाळा पोलीस स्टेशन येथे अर्जदाराच्या मालकीचे अशोक लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. ही चार चाकी गाडी जप्त असुन ती सोडविण्याकरिता अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराने भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५), पर्यावर (संरक्षण) अधिनियम कलम ९, १५ प्रमाणे आरोपी अभिजीत अंगद कोकाटे, यांचे विरूद्ध करमाळा पोलीस स्टेशन येथे गु.र.न.९६/२०२६ हा गुन्हा दाखल केलेला आहे ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१. कंपनी – अशोक लेलँड लि.
२. मॉडेल – बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी.
३. कलर – IRISH CREAM
४. इंजिन नं. – SRH047910P
५. चेचीस नं. – MB1AB42E4SRRC1316
६. गाडी नं. – MH 45 AX 1801

सदर वाहन पोलीसांनी वरील गुन्हयात जप्त केलेले आहे.

**३.** अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार हे मौजे शेटफळ, ता.करमाळा, जि.सोलापुर येथील रहिवासी असुन अर्जदार हे त्यांचे संपुर्ण कुटूंबीयांसह सदर ठिकाणी

राहत आहे. अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदाराची लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. ही चार चाकी गाडी करमाळा पोलीस स्टेशनने जप्त केलेली आहे. अर्जदाराच्या कथनानुसार सदर वाहन अर्जदार यांनी त्यांचे व्यवसायाकामी व नातेवाईकांकडे जाणे–येणेसाठी खरेदी केलेले होते. अर्जदार हे लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडीचे कायदेशीर मालक आहेत.

**४.** अर्जदाराच्या कथनानुसार लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडी करमाळा पोलिस स्टेशन यांनी वरील गुन्हयामध्ये जप्त केल्यापासून अर्जदार यांचा संपूर्ण व्यवसाय, कामधंदा बंद आहे. अर्जदाराच्या कथनानुसार लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडी ही त्यांचे नातेवाईक यांच्या मदतीने उसनवार रक्कमा घेऊन खरेदी केलेली होती. अर्जदाराच्या कथनानुसार लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडी त्यांच्या ताब्यात न मिळाल्यास अर्जदार यांचा व्यवसाय, कामधंदा, नातेवाईकांशी असणारा संपर्क बंद होईल. अर्जदार यांना उसनवार रक्कमा फेडता येणार नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचे अतोनात कधीही न भरून येणारे नुकसान होईल.

**५.** अर्जदाराच्या कथनानुसार सदर वाहन एकाच जागी पडून राहिला तर सदर वाहनाचे स्पेअस्पार्टस व बॅटरी खराब होण्याची शक्यता आहे व वाहनाचे स्पेअर पार्ट गंजुन जाण्याची दाट शक्यता आहे. अर्जदाराने त्याच्या अर्जामध्ये न्यायालय लादेल त्या अटी व शर्तींचे पालन करून तो जप्त वाहन परत मिळविण्यास विनंती केली.

**६.** सहाय्यक सरकारी वकिलांनी निशाणी ०४ वर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जदाराला जर जप्त वाहन परत दिले तर ते अर्जदार विक्री, हस्तांतर करण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे तसेच सदर वाहन अर्जदार पुराव्याच्या वेळी हजर करणार याची शाश्वती नसल्यामुळे त्यांनी प्रस्तूत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

७.	प्रस्तूत अर्जावर तपास अधिकारी यांनी निशाणी ०४ वर त्यांचे म्हणणे दाखल करून जप्त वाहन योग्य व अटी व शर्तीवर अर्जदारास परत करण्यास त्यांची हरकत नसल्याची नमूद केले.

८.	अर्जदाराच्या अर्जाचे तसेच तपासी अधिकारी व सहाय्यक सरकारी वकीलांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे श्री. आर.डी. देशमुख वकील व सरकार तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.एस. वाघमारे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले.

९.	फिर्यादी, अभिजीत शिवाजी साबळे हे रा.मौजे शेटफळ, ता.करमाळा, जि.सोलापुर येथील कायमचे रहिवासी असुन अर्जदार हे त्यांचे संपुर्ण कुटूंबीयांसह सदर ठिकाणी राहत आहेत. फिर्यादीच्या कथनानुसार पोलीसांनी फिर्यादीच्या मालकीची लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५), पर्यावर (संरक्षण) अधिनियम कलम ९, १५ प्रमाणे आरोपी अभिजीत अंगद कोकाटे, याचे विरूद्ध करमाळा पोलीस स्टेशन येथे गु.र.न.९६/२०२६ मध्ये जप्त केलेले आहे. सदर वाहनाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१. कंपनी – अशोक लेलँड लि.
२. मॉडेल – बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी.
३. कलर – IRISH CREAM
४. इंजिन नं. – SRH047910P
५. चेचीस नं. – MB1AB42E4SRRC1316
६. गाडी नं. – MH 45 AX 1801

१०.	अर्जदार हे जप्त वाहनाचे मालक आहेत. अर्जदार यांचे पॅन कार्डची, वाहनाचे आर.सी.बुक व इंशुरंस पावतीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत मुळ वरून पडताळलेली निशाणी ३ च्या दस्तासोबत दाखल केलेली आहे. सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे असुन

सदर वाहन पोलीस स्टेशनला पडुन राहिले तर ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वाहनाचे स्पेअर पार्ट गंजण्याची व खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जर अटी व शर्ती लागुन अर्जदाराला तिच्या मालकीचे वाहन परत केले तर ते योग्य होईल. त्यामुळे प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेऊन मी पुढील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. तपास अधिकारी/पोलीस ठाणे अंमलदार, करमाळा पोलीस स्टेशन यांना आदेशीत करण्यात येते की, गुरनं.९६/२०२६ या गुन्हयात अर्जदाराच्या मालकीचा लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडी रक्कम १५,००,०००/– रूपयाचा बंदपत्र घेऊन अर्जदाराला परत करावा.

३. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, सदर वाहन परत करण्याआधी त्याने १५,००,०००/– रूपयाचे हमीपत्र न्यायालयात दाखल करावे.

४. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, ते सदर वाहन ते इतर कोणाला देणार नाही किंवा ते कोणालाही केसचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या परवानगी शिवाय विकणार नाही.

५. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, त्याने जप्त वाहन यांचे मागून पुढून दोन फोटो अभिलेखावर दाखल करावे. जेणेकरून पुराव्याच्या वेळी सदर फोटोग्राफवरून वाहनची ओळख होऊ शकेल. तसेच तपास अधिकारी यांनी अर्जदाराला जप्त वाहनाचे फोटो घेण्यास सहकार्य करावे.

६. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, न्यायालय सांगेल किंवा तपास अधिकारी सांगेल त्यावेळी लेलँड कंपनीची बडा दोस्त १४ टी.एन.डी.डी. चार चाकी गाडी

न्यायालयासमक्ष हजर करावे.

७. अर्जदाराला आदेशित करण्यात येते की, त्याने जप्त वाहनाच्या स्वरूपात कोणताही बदल करू नये.

AMIT KISHORE SHARMA
Digitally signed by AMIT KISHORE SHARMA
Date: 2026.07.07 15:48:53 +0530

दि.०७/०७/२०२६ (अमित.कि.शर्मा)

करमाळा न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, करमाळा

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original Judgment

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- Rutuja D. Gore |
| (b) | Court | :- CJJD & JMFC, Karmala |
| (c) | Judgment signed by P.O.on | :- 07/07/2026 |
| (d) | Judgment uploaded on | :- 07/07/2026 |